वर्ष-०८ | अंक-५१ | मुंबई, मंगळवार ०८ ते १४ नोव्हेंबर - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
उन्हाळ्यात हिट स्ट्रोकपासून असा करा लहान मुलांचा बचाव

3 → मतदारांच्या पोटातले...

शेतात राखण करायला गेलेल्या तरुणाचा मृतदेहचआढळला, 'या' कारणामुळे तरुणाला ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## अन्न व औषध विभागाची मोठी कारवाई; 29 कोटी रुपयांचे मसाले, ड्रायफ्रुट्स जप्त, मुंबईकरांच्या आरोग्याशी खेळ



अन्न व औषध प्रशासन विभागाकडून नवी मुंबईत मोठी कारवाई करण्यात आली असून तब्बल 29 कोटी रुपयांचे अन्नपदार्थ जप्त करण्यात आले आहेत. एफडीएने टीटीसी इंडस्ट्रीअल एरिया, MIDC तुर्भे, येथे 2 नोव्हेंबर रोजी धाड मारून कारवाई केली होती. त्यावेळी हा प्रकार उघडकीस आला आहे. एफडीएची मोठी कारवाई, 29 कोटी रुपयांचे अन्न पदार्थ जप्त. या मोहिमेंतर्गत एमआयडीसी तुर्भे येथील मे. सावला फूड्स अँड कोल्डस्टोअरेज येथे भेसळयुक्त ...पान ३ वर...

## दिवाळी बोनसनिमित्त नव्या करकरीत नोटांचा हव्यास भोवला; कंत्राटदाराला तब्बल 5 कोटींचा गंडा

नवी मुंबई : बेलापूरमध्ये गुजरातमधील रस्ते कंत्राटदाराला जुन्या नोटा बदलून नव्या करकरीत नोटा देतो, अशी बतावणी करत तब्बल 5 कोटींचा गंडा घालण्यात आला आहे. विशेष म्हणजे या कंत्राटदाराला दिवाळीत आपल्या कर्मचाऱ्यांना बोनस देण्यासाठी नवीन नोटांची आवश्यकता होती. याचाच फायदा घेत ठगांनी बाबूजयेशसिंग ठाकूर यांना सहा कोटींना चुना लावला आहे. विशाल विरोजा, मोईन कादरी, सुशांत कुलकर्णी अशी आरोपींची नावे असून इतरही काही अज्ञात व्यक्तींचा या गुन्ह्यात समावेश असल्याची माहिती बेलापूर पोलिसांनी दिली आहे. आरोपी फरार- यापैकी एका आरोपीला पकडले



असून मुख्य आरोपी मोईन कादरीसह अन्य आरोपी फरार आहेत. अजय मिश्रा नावाचा व्यक्ती आपल्याला नेहमी नव्या नोटा द्यायचा असे कंत्राटदार असलेल्या ठाकूर यांनी सांगितले. ऑगस्टमध्ये ठाकूर यांनी नव्या नोटांसाठी मिश्राशी संपर्क साधला. मिश्राने ठाकूर यांची ओळख विशाल आणि विरोजाशी करून दिली. विशालचा मित्र आरबीआयच्या कोषागारात काम करत असल्याची बतावणी मिश्राने केली. मलाही दीड कोटी रुपयांच्या करकरीत नोटा हव्या आहेत. त्यामुळे आपण नोटा घेण्यासाठी नवी मुंबईला सोबतच जाऊ असे विरोजाने ठाकूर यांना सांगितले. ठाकूर आणि विरोजा २६ सप्टेंबरला बेलापूरला पोहोचले. तिथे त्यांना मोईन काद्री आणि सुशील कुलकर्णी भेटले.नोटांची व्हॅन पाठविण्याची बतावणी करून फसवणूक- आपण आरबीआयचे कर्मचारी असल्याचे सांगत कुलकर्णी त्यांना बेलापूरमधील आरबीआयच्या कार्यालयाजवळ घेऊन गेला. तुम्ही बाहेर थांबा. मी नव्या नोटांनी भरलेली व्हॅन पाठवतो, असे सांगून कुलकर्णी तिथून निघून गेला. थोड्या वेळाने व्हॅन आली. ठाकूर यांनी नोटा दाखवण्याची मागणी केली. मात्र तसे केल्यास अडचण निर्माण होईल असे कारण कुलकर्णी याने दिले. त्यानंतर मोईन काद्री व्हॅनमध्ये बसला. ठाकूर आणि विरोजा यांची कार व्हॅनच्या मागून धावत होती. दोन्ही वाहने गुजरातच्या दिशेने जात असताना तळोजा येथे एका इनोव्हा कारने त्यांना ओव्हरटेक केले. इनोव्हामधील अज्ञातांनी व्हॅनच्या चालकाला धमकावत व्हॅन घेऊन पळ काढला. झाला ...पान २ वर...

## बैक खाते अपडेट करण्याच्या नावाने फसवणुक करण्यात आलेली ३१,९९०/ रुपये रक्कम परत मिळविण्यास सायबर गुन्हे कक्षास यश.



मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील मिरारोड परिसरात राहणा-या महिला श्रीमती agen यांना त्यांचे मोबाईलवर OTP प्राप्त झाला. त्यानंतर काही वेळाने त्यांना बैंक खाते अपडेटचे काम सुरू आहे असे सांगून OTP प्राप्त करुन घेतला व त्यांचे बंक खात्यातुन ४२,१८८/ रुपयाची फसवणूक झालेबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे चौकशीकामी प्राप्त झाला होता. सदर अर्जाच्या चौकशीच्या अनुषंगाने सायकबर गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी तक्रारदार यांचे बंक खात्यामधील झाले व्यवहाराची माहिती घेतली व मिळालेल्या माहितीचे आधारे सदरची रककम True Balance ह्या पेमेंट गेटवेकडे वळते झालेले असल्याच निदर्शनास आले. त्यांनंतर संबधित कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन माहिती प्राप्त केली. प्राप्त माहितीवरून संबधित रक्कम फ्लिपकार्टवर गेल्याचे दिसून आल्याने संबधित कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणूक झालेली ३१,९९०/ रुपयाची रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेले आहे व उर्वरीत रक्केमबाबत चौकशी सुरु आहे. घ्यावयाची काळजी : ७ बंक/क्रेडीट कार्ड कंपनी ग्राहकांना बेक खाते अपडेट करण्यासंदर्भात मोबाईलवर संपर्क करत नाही. ७ आपल्या बंकेची गोपनीय माहिती कोणाकडेही उघड करु नये. ७ आपला ओटीपी किंवा इतर कोणताही पिन क्रमांक देवू नये. ७ अनोळखी लिंक किंवा ware कोड स्कन करू नये. तरी सायबर गुन्हे कक्ष, मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयातर्फे नागरिकांना अशा प्रकारे होणा-या फसवणूकीबाबत सतर्क राहणेबाबत जाहीर आवाहन करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी. सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.हवा. माधूरी धिंडे, पो.अं. प्रविण आव्हाड, म.सु.ब. आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

## ईलेक्ट्रिक बिल अपडेट करण्याच्या नावाने फसवणूक करण्यात आलेली 25,734/ रुपये रक्कम परत मिळविण्यास सायबर गुन्हे कक्षास यश.

मिरा भाईंदर,वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील तुळींज पोलीस ठाणे हद्दीत राहणा-या श्रीमती प्रिया व विरार पोलीस ठाणे हद्दीत राहणारे श्री. वाडकर यांना त्यांचे मोबाईलवर अनोळखी व्यक्तीने फोन करुन तुमचे लाईट बिल भरलेले नाही, त्यामुळे तुमचे लाईट कनेक्शन बंद करणार असल्याचे सांगुन तक्रारदार यांच्या मोबाईल फोनवर आलेला ओटीपी प्राप्त करुन तक्रारदार यांचे बंक खात्यामधून पैसे गहाळ झाल्याबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे चौकशीकामी प्राप्त झाले होते.



सायबर गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी तक्रारदार यांचे बेक खात्यामधील झाले व्यवहाराची माहिती प्राप्त करुन मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांची फसवणक रक्कम पेयु, पेटीएम, मोबिक्विक, फ्रिचार्ज या कंपनीचे पेमेंट वालेटवर गेल्याचे दिसून आल्याने संबधित कंपनीसोबत पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन फसवणूक झालेली २५,७३४/ रुपये रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेले आहे.

घ्यावयाची काळजी : ७ ईलेक्ट्रीसिटी कंपनी (अदानी/एमएसईबी/बेस्ट) ग्राहकांना कधीही फोन करुन बिल भरण्यास सांगत नाही. ७ अशा प्रकारे फोन आल्यास खात्री झाल्याशिवाय कोणताही आर्थिक व्यवहार करू नये. ७ आपल्या बंकेची गोपनीय माहिती कोणाकडेही उघड करु नये. ७ आपला ओटीपी किंवा इतर कोणताही पिन क्रमांक देवू नये.

तरी सायबर गुन्हे कक्ष, मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयातर्फे नागरिकांना अशा प्रकारे होणा-या फसवणकीबाबत सतर्क राहणेबाबत जाहिर आवाहन करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी. सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.हवा.माधूरी Re, पो.अं.प्रविण आव्हाड, म.सु.ब. आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

## घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करून 26 60 000/ रुपये किंमतीची रोख रक्कम व सोन्याचे दागीने हस्तगत शाखा कक्ष 1 काशिमीरा यांची कामगिरी.



दिनांक ०४.११.२०२२ रोजी रात्री ०९:०० ते ११ १५ वाजताच्या दरम्यान, बी/६०४ बी/विंग, विंगस्टोन बिल्डींग, १५ नंबर बस स्टाप, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे येथे फिर्यादी श्रीमती तरन्नुम जावेद खान वय ३० वर्ष, रा. वरील प्रमाणे यांचे रहाते घरातुन घराचे लच तोडुन घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले १) २५,००,०००/ रु. रोख ५०० रुपयांच्या भारतीय चलनाच्या नोटा, २) १,२०,०००/ रु. किमतीचे ३० ग्रम वजनाची सोन्याची चैन जु.वा. ३) ४०,०००/ रु. किमतीचे १० ग्रम वजनाचे कानातील झुमके जु.वा. असा एकुण २६,६०,०००/ रु. किमतीची रोख रक्कम व सोन्याचे दागीने अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरुन नेले बाबत दिले फिर्यादी वरुन मिरारोड पोलीस ठाण्यात गु.रजि.क्र: ४५६/२२ भा.द.वि.स. कलम ४५७, ३८० प्रमाणे दिनांक ०५/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा यांचेकडून गुन्हयाचे घटनास्थळाची ...पान २ वर...

## महिलेची हत्या, नवरा सोडून गेली होती दुसऱ्यासोबत राहायला



ठाणे : नवऱ्याला सोडून दुसऱ्या व्यक्तीसोबत राहणाऱ्या ३७ वर्षीय महिलेची हत्या झाल्याची घटना आज सकाळच्या सुमारास घडली. ही घटना अंबरनाथ तालुक्यातील नेवाळी फाटा परिसरातील एका चाळीत घडली आहे. खळबळजनक बाब म्हणजे मृत महिला ज्या व्यक्तीसोबत राहत होती, त्यानेच तिची हत्या करून पळ काढल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला. याप्रकरणी हिललाईन पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध पोलिसांनी सुरु केला. विक्की बबन देवकते असे फरार आरोपीचे नाव आहे. तर लक्ष्मीबाई मनोहर तायडे (वय ३७) असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. मृतक महिलेचे शव ...पान २ वर...

## दुचाकी वाहन चोरी करणाऱ्या आरोपीतांस अटक करुन एकण ८७ 000/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत- पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी


पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत वाहन चोरीच्या घटनामध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्याने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मागदर्शनाच्या आधारे पेल्हार पोलीस ठाणे गुन्हेप्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बतमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीचे आधारे दोन इसम १) चिराग मनोज मोरया वय २० वर्षे, रा. रुम श्रीराम नगर, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर, २) अरबाज लतीफ राईन, वय १९ वर्षे, रा. बिलालपाडा, नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी मोटर सायकल चोरी केल्याचे सांगितले. नमुद आरोपीत यांना पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हा रजि.नं.९१६/२०२२ भां.द.वि.सं. कलम ३७९,३४ या गुन्हयात दिनांक ०३/११/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे. वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने आरोपीत यांचेकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी तुळीज पोलीस ठाणे हद्दीत देखील मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिली असुन नमुद आरोपीत यांचेकडुन ०२



मोटार सायकल असा एकुण ८७,०००/ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे. उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे. अ.क्र पोलीस ठाणे गुन्हा रजि क्रमांक व कलम १. पेल्हार पोलीस ठाणे. गु.रजि.नं. 1 ९१६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९, ३४ प्रमाणे. (मुळ गुन्हा) २. तुळींज पोलीस ठाणे. गु.रजि.नं. 1 ६७२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शना खाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अमर मराठे पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, यांनी केलेली आहे.

## ऑनलाईन अनुरक्षकाच्या माध्यमातून नोकरीचे आमिष दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास लावणारे अटकेत.

भाईंदर : ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हिसेसच्या (अनुरक्षण सेवा ) माध्यमातुन वेश्याव्यवसाय चालवणा-या इसमांवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष यांनी कारवाई करुन एका पिडीत मुलीची सुटका केली .अधिकमाहिती नुसार दि.०५.११.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कांदरपाडा, दहिसर पुर्व येथे राहणारा विकी उर्फ विजय यादव व त्याचा साथीदार राहुल उर्फ अलोक रवानी हे इंटनेटवर दिसणा-



या जाहिरातीव्दारे गि-हाईकाने मोबाईलवर संपर्क साधला की,आरोपी हा वेश्याव्यवसायासाठी मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये रुम बुक करुन किंवा गि-हाईकास लॉजमध्ये रुम बुक करावयास लावून किंवा त्यांच्या सोयीनुसार वेश्यागमनाकरीता मुली पुरवितो. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोनि समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन विकी उर्फ विजय यादव याच्या सांगण्यावरून अॅटो रिक्षा चालक सुरेश यादव हा हॉटेल पार्क व्ह, फॅमिली ...पान २ वर...

## आयकर अधिकारी बनवून केली 20 लाखांची फसवणूक, माटुंगा पोलिसांनी तिघांना केली अटक

आयकर विभागाचे अधिकारी असल्याचे भासवून पुण्यातील एका व्यावसायिकाची 20 लाख रुपयांचा गंडा घालणाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे. व्यावसायिकाची फसवणूक केल्याप्रकरणी माटुंगा पोलिसांनी (तीन आरोपीना अटक केली आहे. या आरोपींनी पुण्यातील या व्यावसायिकाला जास्त पैसे देण्याचे आमिष देत बनावटी नोट (f a k e



notes) देऊन त्यांची फसवणूक केली. फसवणूक करून आरोपींनी पुणे सोडलं मात्र ते माटुंगा पोलिसांच्या जाळ्यात अडकले. देवराव भाऊराव हिवराळे (35), रविकांत जर्नादन हिवराळे (36) आणि योगेश वासुदेव हिवराळे (22) अशी आरोपींची नवे असून हे सर्व बुलढाणा येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथील व्यावसायिक रामदास दत्तात्रय बल्लाळ यांना आरोपींनी आपण आयकर विभागाचे अधिकारी असल्याचे भावसवले. या ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र
मुंबई
✪ मुंबई, मंगळवार ०८ ते १४ नोव्हेंबर - २०२२


# स्प्राउट्स खायला तुम्हाला आवडते?

## हे पदार्थ टाकून बनवा आणखी चविष्ट



स्प्राउट्स आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. दररोजच्या आहारात याचा समावेश केल्याने आपल्याला बरेच फायदे मिळू शकतात. बऱ्याच लोकांना स्प्राउट्स सकाळी सकाळी खायला खूप आवडते. फिटनेसची काळजी करणा-यांच्या जेवणात तर स्प्राउट्स आपल्याला पाहायला मिळतेच. स्प्राउट्समध्ये अँटीऑक्सिडेंट आणि व्हिटॅमिन सी मोठ्याप्रमाणात असते. त्यामुळे आपल्याला कोणताही आजार होत नाही.

स्प्राउट्समध्ये एंजाइम, फायबर, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, नियासिन, फोलेट, मॅगनीज, कॉपर, जिंक, लोह आणि कॅल्शियम मोठ्या प्रमाणात असते. या सर्व गोष्टी चयापचय वाढविण्यास मदत करतात. तुम्हाला देखील ब्रेकफास्टमध्ये स्प्राउट्स खायचे असेल तर त्याला तुम्ही आणखी चविष्ट बनवू शकता. स्प्राउट्स आणखी चविष्ट बनवण्यासाठी कोणकोणत्या पदार्थांचा वापर करु शकतो हे आज आपण जाणून घेणार आहोत.

**स्प्राउट्समध्ये ड्रायफ्रूट्स टाका –**

तुम्ही स्प्राउट्समध्ये ड्रायफ्रूट्स मिक्स करुन खाऊ शकता. ड्रायफ्रूट्समध्ये तुम्ही बदाम, पिस्ता, काजू, अक्रोड मिक्स करुन खाऊ शकता. यासोबत तुम्ही चीज स्प्रेड आणि ऑलिव्ह ऑइल टाकून खाऊ शकता.

**स्प्राउट्समध्ये भाज्या मिक्स करा –**

स्प्राउट्समध्ये तुम्ही टोमॅटो, कांदा, हिरवी मिरची आणि इतर बऱ्याच भाज्या मिक्स करुन ते खाऊ शकता. या भाज्या स्प्राउट्सची चव वाढवतात आणि त्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. या सर्व गोष्टी स्प्राउट्समध्ये मिक्स केल्यामुळे अँटी-ऑक्सिडेंटचे प्रमाणही वाढते.

**काळे मीठ, भाजलेले जीरे आणि लिंबाचा रस-**

स्प्राउट्समध्ये काळे मीठ, भाजलेले जीरे आणि लिंबाचा रस मिक्स करु शकता. यामुळे स्प्राउट्स आणखी चवदार लागते. या सर्व गोष्टी मिक्स केल्यामुळे लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण स्प्राउट्स आनंदाने खातात.

### स्प्राउट्समध्ये बियांचा वापर करा –

**स्प्राउट्सला आणखी चविष्ट बनवण्यासाठी तुम्ही यामध्ये भोपळयाच्या बिया, सब्जाच्या बिया आणि फ्लेक्स बिया म्हणजे अलसी घालू शकता. यामुळे स्प्राउट्सची चव वाढते. तुम्ही दररोज वेगवेगळया बियांचा वापर करु शकता. या बिया आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहेत.**

# हे आहेत काजूचे महत्त्वाचे फायदे!

## हृदय निरोगी ठेवण्यासह अनेक आजारांपासून होते संरक्षण

**काजू खायला अनेकांना आवडतात. काजू आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असतात. काजूचा वापर चवदार आणि गोड पदार्थांमध्ये केला जातो. अनेक डिशमध्ये गार्निशिंगसाठी देखील काजू वापरले जातात. काजूमध्ये प्रथिने, फायबर, झिंक, फॉस्फरस आणि अँटीऑक्सिडंट्स या सारखे पोषक घटक असतात. काजूमध्ये साखरेचे प्रमाण अतिशय कमी असते. तसेच काजूचे सेवन हा निरोगी आणि पौष्टिक आहार मानला जातो. काजूमध्ये कॉपरचा देखील समावेश असतो. शरिरातील रोग प्रतिकारक शक्ती आणि बुद्धीच्या विकासासाठी काजू हा अतिशय उपयुक्त पदार्थ आहे.**



हृदयरोगाचा धोका कमी होतो : काजूचे नियमित सेवन हृदयासाठी अतिशय उपयुक्त असते. काजूमध्ये मोठ्या प्रमाणात मॅग्नेशियम असते. यामुळे हृदय आणि रक्तवाहिन्याशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो. काजूमध्ये अँटी इंफ्लेमेटरी घटकांसह जीवनसत्त्वे, फायबर आणि खनिजे देखील असतात. हे घटक हृदय तंदुरुस्त ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**मधुमेह नियंत्रित ठेवतात काजू** : काजूमध्ये इतर नट्सच्या तुलनेत कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी असते. काजू हे फायबरने समृद्ध असतात त्यामुळे मधुमेहाची लक्षणं कमी करण्यासाठी काजूची मदत होते. काजू रक्तातील साखरेचे प्रमाण वाढण्यास प्रतिबंधित करतात.

**कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवण्यास मदत** : शरीरातील कोलेस्ट्रॉलची वाढलेली पातळीमुळे हृदयाचे अनेक आजार उद्भवू शकतात. यामुळे रक्त प्रवाह देखील मंदावतो. अशा वेळी काजूचे नियमित सेवन केल्याने शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते. काजूमध्ये असलेले स्टीरिक ॲसिड रक्तातील कोलेस्टेरॉल देखील नियंत्रित ठेवण्याचे काम करते.

**डोळे निरोगी ठेवण्यासाठी उपयुक्त** :काजूमध्ये ल्युटिन आणि झेंथिन हे घटक असतात. यामुळे डोळ्यातील पडद्ये सुरक्षित राहतात. त्यामुळे डोळे निरोगी राहण्यास मदत होते. काजूचा आणकी एक महत्त्वाचा फायदा असा की, हा पदार्थ हानिकारक अतिनील किरणांपासून देखील डोळ्यांचे संरक्षण करतो.

**वजन कमी करण्यासाठी उपयुक्त** :काजूमध्ये ओमेगा 3 फॅटी ॲसिडने समृद्ध असतात. काजूमुळे शरीराची पचनसंस्था देखील सुधारते. तसेच वजन कमी करण्यासाठी आणि शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यास काजू हा अतिशय उपयुक्त पदार्थ आहे.

# उन्हाळ्यात हिट स्ट्रोकपासून असा करा लहान मुलांचा बचाव



### मुलांसाठी निवडा योग्य कपडे –

**मुलांसाठी नेहमी योग्य कपड्यांची निवड केली पाहिजे. कपडे मुलांच्या संरक्षणामध्ये खूपच महत्वाची भूमिका साकारतात. मुलांना सैल कपडे घालावी आणि त्याचे फॅब्रिक सूती असावे याची आपण काळजी घेतली पाहिजे. सुती कपडे कडक उन्हामुळे येणारा घाम शोषून घेतात. उन्हाळयात मुलांना हलक्या रंगाचे कपडेच घालावे. तसंच मुलांना लांब बाा असलेले शर्ट घालावे जेणेकरून सूयापासून त्यांचे संरक्षण होईल आणि सनबर्नसारखी समस्या उद्भवणार नाही.**

आपल्या सर्वांनी उन्हाुयामध्ये विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. उन्हाुयामध्ये लहान मुलांची विशेषतः नवजात मुलांची काळजी घेणे खूप गरजेचे असते. उन्हाुयात मुलांचे उन्हापासून संरक्षण करणे आणि त्यांची काळजी घेणे ही पालकांची जबाबदारी असते. या कडक उन्हाुयात आपण आपल्या लहान मुलांची कशापद्धतीने काळजी घेतली पाहिजे हे आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

**मुलांना थंड ठिकाणी ठेवा –**

उन्हाळ्यात लहान मुलांना नेहमीच थंड ठिकाणी ठेवावे याची विशेष काळजी आपण घेतली पाहिजे. लहान मुलांना गरम खोल्यात किंवा पार्क केलेल्या कारमध्ये ठेवू नये. अन्यथा त्यांना हिट स्ट्रोक सारख्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की आपण आपल्या मुलांसाठी समर-फ्रेंडली बेबी केअर प्रोडक्ट्स वापरली पाहिजेत. जेणेकरून उष्णतेचा त्रास त्यांना होणार नाही. जर तुम्ही आपल्या बाळासाठी कॅरियर वापरत असाल तर ते डेनिम सारख्या जाड कपड्यांऐवजी नायलॉनसारख्या हलक्या फॅब्रिक्सचे असावे. जेणेकरून त्यामध्ये लहान मुलांना गरम होणार नाही.

### मुलांना सनस्क्रीन लावा –

**मुलांना बाहेर घेऊन जाताना विशेष काळजी घेतली पाहिजे. बाहेर उन्हात जाण्यापूर्वी मुलांच्या त्वचेवर सनस्क्रीन लावा. मुलांची त्वचा नाजूक आणि पातळ असते त्यामुळे सूर्यप्रकाशामुळे त्यांच्या त्वचेला नुकसान पोहचते. पण एक गोष्टी नेहमी लक्षात ठेवा की ६ महिन्यांपेक्षा लहान मुलांना सनस्क्रीन लावू नका. या ऐवजी तुम्ही मुलांना हलक्या कपड्या झाका. जेणे करुन सूर्यप्रकाशामुळे त्यांच्या त्वचेला नुकसान पोहचणार नाही.**

**मुलांना हायड्रेटेड ठेवा –**

मुलांना उन्हाळ्यात हायड्रेटेड वाटेल याची विशेष काळजी घेतली पाहिजे. लहान मुलांना उन्हाळ्यात अशा गोष्टी दिल्या पाहिजेत ज्यामुळे त्यांच्या शरीरात पाण्याचे प्रमाण वाढेल आणि ते नेहमी हायड्रेटेड राहतील.



## घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक

पाहणी करुन घटनास्थळावरुन मिळुन आलेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे व फिर्यादीकडुन तपासात मिळून आलेल्या माहितीप्रमाणे सदरचा गुन्हा हा फिर्यादी यांचा भाऊ फरमान जावेद खान, व्यवसाय रिक्षा ड्रायव्हर, सध्या रा. प्लाट नं. २०, मालवणी गेट नं.५, मदर टेरेसा स्कुल जवळ, मालवणी मालाड, प. याने केला असल्याचा संशय आल्याने सदर संशयित याचा शोध घेता तो त्याची पत्नी व मुलगा व मेहुणी सोबत कोठेतरी निघुन गेला असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीच्या अनुषंगाने संशयित याचा सदर ठिकाणी मिळालेल्या तांत्रिक माहितीनुसार गुन्हे शाखा कक्ष १ चे अधिकारी व अंमलदार यांच्या तीन वेगवेगळया टिम तयार करुन तपास पथके शोध घेण्याकामी पाठविण्यात आले. सदर टिमकडून वेगवेगळया रेल्वे स्टेशन वरुन मिळविण्यात आलेल्या तांत्रिक माहितीचे विश्लेषण करुन आरोपीत हा गुजरात राज्यात पळुन जात असल्याचे दिसुन आले. त्याप्रमाणे तपास पथकाने आरोपीत याचा वापी, सुरत, वलसाड परिसरात शोध घेत असतांना आरोपीत हा वलसाड, राज्य गुजरात येथे मिळुन आल्याने त्यास दिनांक ०६/११/२०२२ रोजी ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीत याचे कडुन सदर गुन्हयांतील घरफोडी चोरी करुन नेलेल्या मालमत्तेतील २५,२४,५००/ रुपये रोख रक्कम व गुन्हयांत वापरलेले ०६ मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहेत. सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा कक्ष १ काशिमीरा नेमणुकीतील पो.नि. अविराज कुराडे,

## ऑनलाईन अनुरक्षकाच्या माध्यमातून

रेस्टॉरंट आणि बारसमोर रस्त्यावर, श्री. लक्ष्मी पार्क, कनकिया रोड, गॅलक्सी हॉस्पीटलजवळ, मिरारोड पुर्व या ठिकाणी पुरुष गि-हाईकास मुलीला पुरविण्यासाठी आला होता त्यावेळी बोगस गि-हाईक व पंच यांना नमुद ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दि.०५.११.२०२२ रोजी छापा टाकून कारवाई केली असता रिक्षा चालक सुरेश रामनरेश यादव हा त्याचे रिक्षा मधुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात पैसे स्विकारुन पुरुष गि-हाईकास मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याकडे चौकशी अंती त्याचा साथीदार हा रविकुमार उर्फ छोटु इंदो राम, वय-२३ वर्ष, यास एस.डि. थॉमस स्कुलच्या जवळ असलेली चाळीच्या पहिल्या माळयावर, कांदरपाडा, नयागाव, दहिसर प., मुंबई येथुन ताब्यात घेवुन वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०१ पिडित महिलेची सुटका करण्यात आली. अटक आरोपी व पाहिजे आरोपी विकी उर्फ विजय यादव व राहुल उर्फ अलोक रवानी यांच्याविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील कारवाई पोलीस करीत आहेत. सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप.आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.पो.नि. उमेश पाटील, रामचंद्र पाटील, पो.शि. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, म.स.ब. किरण मोरे सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर व म.पो.हवा. यादव नेमणुक मनुष्यवध तपास पथक यांनी केली आहे.

## दिवाळी बोनसनिमित्त नव्या

प्रकार पाहून ठाकूर आणि विशाल घाबरले. पोलिसांकडून तपास सुरू - त्यानंतर आरोपी काद्री त्यांना बीकेसीतील एका हॉटेलमध्ये भेटला. व्हॅन आणि कार आरबीआयच्या दक्षता पथकाने जप्त केल्याचे काद्रीने त्यांना सांगितले. तसेच कुलकर्णी हे सगळे प्रकरण व्यवस्थित सोडवेल, अशी खात्री त्याने ठाकूर यांना दिली. मात्र त्यानंतर काद्रीने ठाकूर आणि विशाल यांच्याशी संपर्कच तोडला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच ठाकूर यांनी सीबीडी बेलापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत असून इतर आरोपींचा शोध घेत आहेत.

## महिलेची हत्या, नवरा

पोलिसांनी घेतले ताब्यात दिवसापूर्वी आरोपी सोबत : पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार मृत महिला ४ ते ५ दिवसापूर्वीच आरोपी विक्की सोबत नेवाळी फाटा भागातील साईबाबा चाळीत राहण्यास आली होती. ती मूळची अकोला जिल्ह्यातील पिंपळखुंटे गावात राहणारी होती. त्यातच आज सकाळी सात वाजल्याच्या सुमारास तिचा मृतदेह ती राहत असलेल्या घरात आढळून आला. तर तिच्यासोबत राहणारा विक्की पसार झाला होता. या घटनेची माहिती शेजाऱ्यांनी हिललाईन पोलिसांना देताच पोलीस पथक काही वेळातच घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करत लक्ष्मीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी उल्हासनगर मधील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात रवाना केला. लक्ष्मीची गळा आवळून हत्या : विशेष म्हणजे मृत लक्ष्मी व विक्की चाळीत एकत्र राहत होते. मात्र दोघांचे नातेसंबंध काय? हे अद्यापही समोर आलेले नाही. दुसरीकडे लक्ष्मीची हत्या गळा आवळून झाल्याचे शवविच्छेदनाच्या अहवालात समोर आल्याने हिललाईन पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल केला. विक्की हा म्हाडामध्ये वाहनचालक म्हणून कार्यरत असल्याची माहिती पोलीस पथकाला मिळाली असून आरोपीच्या शोधासाठी दोन पथक हिललाईन पोलिसांची रवाना झाले आहे. हत्येचे कारण गुलदस्त्यात - दरम्यान मृत लक्ष्मीच्या नातेवाईकांचा पोलीस शोध घेत असून विक्कीने तिची हत्या कोणत्या उद्देशाने केली

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१
संगणक विभाग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

MBMC/Computer/ 397 /2022-23 Date: 21/10/2022

// First Extension Tender Notice //

Mira Bhainder Municipal Corporation invites Online tender (Tender ID 2022 MBMC 843423 1) To provide internet to Mira Bhaindar Municipal Corporation Offices for one year vide no. MBMC/P.R.O./299/2022-23 dated 13/10/2022. But due to less response we extend the tender for the same work. The tender form and other relevant document will be available for download on MBMC's E-tendering website https://mahatenders.gov.in from Dt.02/11/2022 at 1.00 p.m. If possible the tenders will be opened in the presence of the bidders of their representative on Dt.04/11/2022 at 5.30 p.m. at the tender cell of Mira Bhainder Municipal Corporation.

Ref.: MBMC / PRO / 322 / 2022-23
Date : 01 /11 / 2022

सही/-
( R.M. Gharat)
System Manager
MBMC

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर पश्चिम, ता.जि.ठाणे, ४०११०१
संगणक विभाग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

MBMC/Computer/ 419 /2022-23 Date: 02/11/2022

// Second Extension Tender Notice //

Mira Bhainder Municipal Corporation invites Online tender (Tender ID 2022_MBMC_843423_1) To provide internet to Mira Bhaindar Municipal Corporation Offices for one year vide no. MBMC/P.R.O./322/2022-23 dated 01/11/2022. But due to less response we extend the tender for the same work. The tender form and other relevant document will be available for download on MBMC's E-tendering website https://mahatenders.gov.in from Dt.11/11/2022 at 1.00 p.m. If possible the tenders will be opened in the presence of the bidders of their representative on Dt.15/11/2022 at 5.30 p.m. at the tender cell of Mira Bhainder Municipal Corporation.

Ref.: MBMC / PRO / 327 / 2022-23
Date : 02 /11 / 2022

सही/-
( R.M. Gharat)
System Manager
MBMC

संपादकीय...



# मतदारांच्या पोटातले...

कोणत्याही पोटनिवडणुकांमधून देशभरातील जनमताचा कल काय, याविषयीचा निष्कर्ष काढता येत नाही, हे खरेच. तरीही अवघ्या दीड-पावणेदोन वर्षांवर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे निकाल राजकीय पक्षांना काही ना काही संदेश देऊन जातात, हे नक्की. देशातील विधानसभा पोटनिवडणुकांचे निकाल भारतीय जनता पक्षाबरोबरच विरोधकांसाठीही दिशादर्शक आहेत. त्यातही महाराष्ट्र आणि बिहार या दोन राज्यांतील पोटनिवडणुका दोघांसाठीही महत्त्वाच्या होत्या.त्याचे कारण म्हणजे या दोन राज्यांत अलीकडेच झालेल्या सत्तांतराची पार्श्वभूमी या पोटनिवडणुकांना होती. महाराष्ट्रात अंधेरी (पूर्व) या मतदारसंघात झालेली निवडणूक शेवटच्या क्षणी भाजप उमेदवाराने मोठ्या नाट्यपूर्ण रीतीने घेतलेल्या माघारीनंतर केवळ लुटुपुटीचीच होती आणि त्यात अपेक्षेप्रमाणेच उद्धव ठाकरे यांच्या उमेदवार ऋतुजा लटके यांनी विजय मिळवला आहे; तर बिहारमधील मोकामा मतदारसंघ लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाने जिंकला असला तरी गोपाळगंज येथे मात्र भाजपच्या गळयात विजयाची माळ पडली आहे. गोपाळगंज जिल्हा हा लालूप्रसादांचा जिल्हा असल्याने, या यशामुळे भाजप आता आगामी लोकसभा निवडणुकीत अधिक जोमाने कामास लागणार, हे उघड आहे. या दोन राज्यांतील तीन जागांच्या पोटनिवडणुकांबरोबरच तेलगंणातील निवडणुकीकडेही सगळयांचे लक्ष लागून राहिले होते. त्या राज्यात भाजप तेलंगणा राष्ट्र समितीचे आमदार खरेदी करू पाहत असल्याच्या आरोपांनंतर उभ्या राहिलेल्या वादंगात होते. तेथे भाजपच्या उमेदवाराने ज्या शर्थीने झुंज दिली, ती बघता आता तेथील राजकारण बदलू पाहत आहे, याची साक्ष मिळते. तेलंगणांत आजवर 'टीआरएस' आणि काँग्रेस यांच्यातच लढत होत असे. मात्र, आता भाजप तेथे दुसरे स्थान मिळविण्याचा अटोकाट प्रयत्न करीत असल्याचे दिसते. उत्तर प्रदेशात गोला गोकर्णनाथ येथील जागा भाजप न जिंकता तरच नवल म्हणावे लागले असते. त्याचबरोबर हरयाना आणि ओडिशा येथेही मिळालेले विजय भाजपसाठी महत्त्वाचेच आहेत. एकंदरित या निकालांत भाजपला मोठे यश मिळाल्याचे दिसत असले, तरी विरोधकांची पतही किमान काही प्रमाणात राखली गेली आहे.

शिवसेनेत मोठी फूट पाडून, भाजपने घडवून आणलेल्या सत्तांतराच्या महानाट्यानंतर अंधेरीत झालेल्या या पोटनिवडणुकीकडे राजकीय निरीक्षकच नव्हे तर सर्वसामान्य मतदार तसेच शिवसैनिकही डोळे लावून होते. ऋतुजा लटके यांना उमेदवारीच मिळू नये, म्हणून हाती असलेल्या सर्व स्तरांवरील यंत्रणांचा वापर भाजपने केल्याचे स्पष्ट दिसत होते. मात्र, उच्च न्यायालयानेच लगावलेल्या चपराकीनंतर अखेर ही लढत श्रीमती लटके विरुद्ध भाजप अशी होणार, हे स्पष्ट झाले. त्यानंतर भाजपला काय साक्षात्कार झाला, ते अयोध्येतील रामच जाणे! नंतरच्या अवघ्या २४ तासांत राज ठाकरे यांनी एक खुले पत्र लिहून भाजपला महाराष्ट्राच्या उदात्त संस्कृतीची आठवण करून दिली आणि अखेर शेवटच्या क्षणी भाजपने उमेदवारी मागे घेतली. तेव्हाच संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात प्रतिष्ठेच्या म्हणून गणल्या गेलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी पदरी पराभव येऊ नये म्हणूनच भाजपने माघार घेतल्याची चर्चा सुरू झाली होती.

मात्र, भाजपने माघार घेतल्यानंतरही काही अपक्ष उमेदवार रिंगणात असल्यामुळे निवडणूक ही झालीच; आणि त्यात अपेक्षेप्रमाणेच ऋतुजा लटके यांचा विजय झाला आहे. आता या मतदानात 'नोटा'ला झालेल्या काही हजार मतदानाच्या आकड्याकडे लक्ष वेधून, उद्धव ठाकरे यांना मुंबईत कसा पाठिंबा नाही, ते दाखवण्याचा प्रयत्न भाजपची काही वाचाळ मंडळी करत आहेत. मात्र, या निवडणुकीत 'आपला' उमेदवार नसला तरी 'नोटा'ला मतदान करा, असा प्रचार कुजबुज मोहिमेतून गेले १५ दिवस कोण करत होते, ते लपून राहिलेले नाही. 'नोटा'ला झालेले मतदान हे भाजप तसेच संघपरिवाराचे मतदान आहे आणि त्यांचा पाठिंबा उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारास असणे शक्यच नव्हते, याकडे मात्र हे लोक सोयीस्कर दुर्लक्ष करत आहेत.

'नोटा'ला खूपच जास्त मते मिळाली असली तरी ते मतदान हे उद्धव ठाकरे यांच्या विरोधातील नाराजीचे द्योतक आहे, असे त्यामुळेच म्हणता येणार नाही.

• • •

# वावदुकांची वटवट !

आपल्या संस्कृतीत ज्याप्रमाणे शिमगा या सणाचे महत्त्व आहे त्याप्रमाणे तसे महत्त्व असलेले 'उत्सव' अन्य संस्कृतींतही आहेत. आपापल्या मनांतील भडास, मळमळ, गाळ इत्यादी रिकामी करण्याच्या उद्देशाने या उत्सवांची निर्मिती झाली असावी. हे 'उत्सव' संपले की माणसे आपापल्या नियमाधारित जगण्याकडे वळत. त्यामुळे शिमगा वा तत्सम उत्सव सतत बारा महिने असू शकत नाहीत. पण तंत्रज्ञानाच्या विस्ताराने ज्याप्रमाणे बारा महिने किलगड खायची संधी उपलब्ध करून दिली त्याचप्रमाणे समाजमाध्यमांच्या विकसनाने १२ महिने २४ तास तीनही त्रिकाल शिमगा-सदृश उत्सव साजरे करण्याची संधी मानवतेस दिली. 'फेसबुक', 'इन्स्टाग्राम', 'टिकटॉक' ही अशी कायमस्वरूपी शिमगास्थळे. अशांमध्ये अलीकडेपर्यंत समाविष्ट नसलेले, आकाराने लहान आणि तंत्रज्ञानाने सुमार; पण शिमगास्थळाकडे वाटचाल करणारे माध्यमकेंद्र सध्या चर्चेत आहे. ट्विटर हे ते माध्यमकेंद्र इलॉन मस्क या आंतरराष्ट्रीय शिमगापुरुषाने ४४०० कोटी डॉलर्सला विकत घेतले आणि त्यावर वादळ घोंघावण्यास सुरुवात झाली. मस्कने नवी कंपनी हाती आल्या आल्या प्रचंड कर्मचारी कपात केली, जे कर्मचारी या स्थळाचे पावित्र्य, नैतिकता राखण्यास तैनात होते; त्यांनाच सामुदायिक नारळ दिले गेले. या शिमगास्थळी काही महाजनांस विशेष दर्जा होता. तो दर्शवणारी 'ब्ल्यू टिक' (निळी 'बरोबर'ची खूण) या महाजनांच्या नावासमोर असते. मस्कने हा महाजन-दर्जा विकायला काढला. महिना आठ डॉलर्स मोजणाऱ्यास तो सहज मिळेल. हे सर्व आपण करीत आहोत कारण ट्विटरचे अर्थारोग्य पार बिघडलेले आहे, असे त्याचे म्हणणे. ते खरे. पण प्रश्न पैशाचा नाही. ट्विटरचे उद्दिष्ट काय होते, काय झाले आणि काय होऊ घातले आहे या प्रश्नांची उकल करीत गेल्यास खरी समस्या काय ते लक्षात यावे.

उदाहरणार्थ फेसबुक, टिकटॉक, यूट्यूब वा इन्स्टाग्राम यांच्या तुलनेत ट्विटर हे तंत्रज्ञान आणि माध्यम म्हणून अत्यंत साधे आहे. फेसबुकचे सक्रिय वापरकर्ते आहेत २८० कोटी, टिकटॉक १२० कोटी, यूट्यूब २०० कोटी, इन्स्टाग्राम १४० कोटी आणि या तुलनेत ट्विटरचे सक्रिय वापरकर्ते आहेत जेमतेम २१ कोटी ७० लाख इतकेच. यावर प्रश्न असा की तरीही ट्विटरची इतकी चर्चा का? त्याचे उत्तर त्याच्या वापरकर्त्यांत आहे. जगातील अनेक राजकारणी,



उद्योजक, लेखक, कलावंत, पत्रकार, आपल्यासारख्या देशात सरकारचे आनंददूत उद्योगपती या माध्यमाचा वापर करतात. उर्वरित वापरकर्ते या माध्यमावर येतात ते हे महाजन कोणत्या विषयावर काय म्हणत आहेत हे जाणून घेण्यासाठी. म्हणजे ट्विटरची महत्ता असे अनेक मान्यवर येथे व्यक्त होतात या सत्यात आहे. जॅक डॉर्सी आणि अन्यांकडून या माध्यमाची निर्मिती झाली ती या उद्देशाने. कलात्मकता, वैचारिकता आदींचे मुक्त आंतरराष्ट्रीय व्यासपीठ हवे हा या माध्यमाच्या निर्मितीमागील विचार. लंडनमध्ये शहराच्या मध्यवर्ती स्वप्निल अशा हाइड पार्कच्या विस्तीर्ण उद्यानातील एका कोपऱ्यात दररोज कोणीही कशावरही भाषण देऊ शकतो. अभिव्यक्तिस्वातंत्र्याची ही स्वप्नवत अवस्था. सर्व समाज जेव्हा प्रौढ समंजसतेच्या एका विशिष्ट पातळीवर येतो तेव्हा या असल्या उपायांचे मोठेपण कळते. पण ही पातळी जर सुटली आणि कोणीही कसलाही धरबंध न पाळता अत्यंत असभ्यपणे या व्यासपीठाचा वापर करू लागला तर तो अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा स्वैराचार ठरतो आणि व्यासपीठ आणि चावडी यांतील फरक नष्ट होतो. ट्विटरचे हे असे झाले. चांगले तंत्रज्ञान बेजबाबदारांहाती गेले की असेच होते. परिणामी जगभर या माध्यमांद्वारे कोण काय विचार, संदेश पसरवू पाहतो याची चर्चा सुरू झाली आणि या माध्यमाची स्फोटक क्षमता अनेकांच्या ध्यानात आली. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांचा उदय, ब्रिटनमध्ये 'ब्रेग्झिट'साठीचा अपप्रचार इत्यादी उदाहरणांतून हे दिसले. परिणामी या मुक्त व्यासपीठाच्या मुक्ततेचा गैरफायदा कोण, कसा घेत आहे यावर नियंत्रण ठेवण्याची गरज निर्माण झाली आणि ती लक्षात घेत ट्विटरने त्यासाठी विशेष कर्मचारी वर्ग नेमला.

ही कंपनी मस्क याच्या हाती गेली आणि नेमकी याच कर्मचाऱ्यांस मोठ्या प्रमाणावर कात्री लागू लागली. मस्क स्वतःस आचार/विचारस्वातंत्र्याचा रक्षणकर्ता मानतो. पण त्याच्या विरोधात मतप्रदर्शन करण्यास त्याचा विरोध. मानवतेच्या भल्यासाठी आपण ट्विटर विकत घेतल्याचा त्याचा दावाही असाच. पैशाची गरज आहे म्हणून 'ब्ल्यू टिक'धारकांस तो शुल्क लावू पाहातो. पण या 'ब्ल्यू टिक'ला पात्र ठरण्यासाठी काही अटी, प्रक्रिया पार पाडल्या जातात आणि काही निकषांवर आधारित तो निर्णय होतो. व्यक्तींची अधिकृतता, त्या त्या क्षेत्रातील त्याचा अधिकार इत्यादी. पण आता आठ डॉलर फेकले की कोणालाही ही निळी खूण धारण करता येईल. या असल्या उपायांमुळे काही काळ ट्विटरचा महसूल वाढेलही. पण अंतिमतः त्या कंपनीचे नुकसानच होईल. कारण आपापल्या क्षेत्रात काही एक सिध्द केलेले आणि वाटेल त्या बडबडीने 'अनुयायी' मिळवू शकणारे हे एकाच पातळीवर येतील. म्हणजे 'फेसबुक'चे जे झाले ते या माध्यमाचेही होईल. आंतरराष्ट्रीय शिमगास्थळ. अशा वेळी या माध्यमाचा म्हणून एक स्वतंत्र गुण होता तो नष्ट होईल. एखाद्या उत्पादनाने त्याचा हा अनन्यगुण (यूएसपी - युनिक सेलिंग पॉइंट) गमावला की ते अन्यांतील एक होते. ट्विटरबाबत हेच लक्षात आल्याने जगातील अत्यंत बलाढ्य कंपन्यांनी या माध्यमावर जाहिरात करणे कमी केले आणि काहींनी तर त्या न करण्याचा निर्णय घेतला. बौद्धिक क्रयशक्ती असलेले वापरकर्ते कमी होऊन नुसती निर्बुध्दांची भरताडच वाढणार असेल तर कंपन्यांचा हा निर्णय तार्किकच ठरतो. तेव्हा प्रचारकी, कंठाळी, प्रक्षोभक एकांगी मते मांडणाऱ्यांचीच सद्दी ट्विटरवर तयार होणार असेल तर त्या निळ्या खुणेसाठीच्या शुल्काची काय मातबरी? त्यामुळे १३०० कोटी डॉलर्सचे कर्ज आणि त्यावर वर्षाला पाच कोटी डॉलर्सचे व्याज भरण्याइतकी आर्थिक क्षमता ट्विटरला मिळणे केवळ अशक्य.

हेच वास्तव आणि त्यातील धोका लक्षात घेऊन युरोपीय देश, अमेरिका आदींनी मस्क आणि ट्विटर यांच्याबाबत कडक भूमिका स्वीकारली. 'पक्षी मुक्त झाला' असे मस्कने ट्विटरची मालकी स्वतःकडे आल्यावर म्हटले होते. त्यावर ''पण हा पक्षी आमच्या आकाशात आमच्या नियमांचे पालन करूनच विहरेल'' असे संबंधित खात्याच्या ब्रिटिश अधिकाऱ्याने सुनावले. याचा अर्थ एकांगी, प्रचारकी, भडक संदेशवहन इतकेच या जागतिक शिमगास्थळी होणार असेल तर ते तसे करू दिले जाणार नाही. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी तर ट्विटर आणि मस्क यांची संभावना 'असत्याच्या प्रचार-प्रसाराचे सूत्रधार' अशी केली. अमेरिकी कंपनी असूनही बायडेन यांनी 'आपला तो बाब्या' ही वृत्ती दाखवली नाही याकडे दुर्लक्ष केले तरी त्यांच्या म्हणण्यातील मथितार्थाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अर्थात या अशा आंतरराष्ट्रीय शिमगास्थळी आपले पाठीराखे मिरवणाऱ्यांची आणि तसे मिरवणाऱ्यांना मिरवणाऱ्यांची संख्याही काही कमी नाही, हे खरे. दर्जापेक्षा संख्येला महत्त्व येऊ लागले की असे होणे अपरिहार्यच. आता तर वादग्रस्त सौदी राजघराणे या ट्विटरमध्ये प्रचंड गुंतवणूक करीत असल्याचे समोर येते. ही गुंतवणूक ट्विटरची मालकी असलेल्या मस्क याच्या खालोखाल असेल. म्हणूनच व्यक्तिस्वातंत्र्य, सभ्यता आदी मूल्ये मानणारे ट्विटरच्या कोट्यवधी वापरकर्त्यांचा खासगी तपशील मस्कप्रमाणे सौदीकडेही जाईल या विवंचनेत आहेत.

यानिमित्ताने गंभीर, मूलगामी आदीपेक्षा वावदुकांच्या वटवटीलाच अलीकडे येऊ लागलेले महत्त्व हा चिंतेचा विषय असायला हवा. मस्कसारख्या जातिवंत वावदुकाहाती ट्विटर जाण्याने ही चिंता अधिकच वाढते.

• • •

# मुख्यमंत्री शिंदे 40 आमदारांसह पुन्हा गुवाहाटीला जाणार

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतल्या ४० आमदारांसह बंड करत राज्यात भाजपसोबत सत्ता स्थापन केली आहे. तीन महिन्यांपूर्वी विधानपरिषदेच्या निवडणुकीत मतदान केल्यानंतर शिंदे गटाचे आमदार सूरतमार्गे गुवाहाटीला रवाना झाले होते. त्यानंतर आता मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे हे ४० आमदारांसह पुन्हा गुवाहाटीचा दौरा करणार असल्याची माहिती समोर आली आहे. शिंदे गटाचे सर्व आमदार पुढच्या आठवड्यात गुवाहाटीला जाण्याची शक्यता आहे. कारण याबाबत गुवाहाटीतील स्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि कार्यक्रमाचं

## या कारणामुळं दौ-याची होतेय चर्चा

नियोजन करण्यासाठी शिंदे गटाचे काही नेते गुवाहाटीला गेल्याची माहिती समोर आली आहे.

पुढच्या आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सर्व समर्थक आमदारांसह गुवाहाटीला जाणार आहे. या दौ-यात ते कामाख्या देवीचं दर्शन घेणार असून ज्या लोकांनी अथवा नेत्यांनी शिंदे गटाला बंडावेळी गुवाहाटीत मदत केली होती, त्यांचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आभार मानतील, अशी माहिती आहे. त्यात आसामचे मुख्यमंत्री हेमंता बिस्वा शर्मा, आसामचे राज्यपाल, गुवाहाटीचे पोलीस अधिक्षक आणि इतर काही महत्त्वाच्या नेत्यांची मुख्यमंत्री शिंदे भेट घेण्याची शक्यता आहे.

काही दिवसांपूर्वीच शिंदे गटातील सर्व आमदार उत्तर प्रदेशातील अयोध्येच्या दौ-यावर जाणार असल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. त्यानंतर आता शिंदे गटाचे सर्व आमदार गुवाहाटीला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळं आता शिंदे गटाचे आमदार आधी गुवाहाटीला जाणार की अयोध्येला याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे.

# मध्यरात्री थरार; मनसेच्या नेत्यावर प्राणघातक हल्ला

**मुंबई :** मुंबईलगत असलेल्या पनवेलमध्ये मध्यरात्री काही लोकांनी पनवेलचे मनसे शहर उपाध्यक्ष मनोज कोठारी यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. त्यामुळं शहरात खळबळ उडाली असून या हल्ल्यानंतर कोठारी यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. कोठारी यांच्यावर पनवेलमधील एका हॉटेलबाहेर हल्ला करण्यात आला असून मनसेच्याच काही कार्यकर्त्यांनी त्यांना मारहाण केल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पनवेलमध्ये मनसेचे शहर उपाध्यक्ष मनोज कोठारी यांच्यावर मध्यरात्री तीन वाजता काही लोकांनी हॉकी स्टिक आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला आहे.



या घटनेनंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पक्षाचं पद न मिळाल्यामुळं शहरातील काही मनसेचे कार्यकर्ते कोठारी यांच्यावर नाराज होते. त्यामुळं कार्यकर्त्यांसोबत त्यांचे गेल्या काही दिवसांपासून वाद होत होते. त्यामुळं या रागातूनच त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळं आता या प्रकरणात पनवेल पोलिसांनी तपास सुरू केला आहे. काही दिवसांपूर्वीच परभणीत मनसेच्या शहराध्यांची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर आता पनवेलमध्येही मनसेच्या शहर उपाध्यक्षांवर जीवघेणा हल्ला करण्यात आल्यानं खळबळ उडाली आहे.

# अंधेरीत लढलो असतो तर निश्चित जिंकलो असतो; आशिष शेलारांनी व्यक्त केली खंत

**मुंबई :** अंधेरी पूर्व विधानसभेच्या पोटनिवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला आहे. या पोटनिवडणुकीत ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटकेंचा मोठा मताधिक्यानं विजय झाला आहे. त्यामुळं गेल्या काही महिन्यांपासून राजकीय संकटात



सापडलेल्या ठाकरे गटाला मोठा दिलासा मिळाला आहे. विजयानंतर ऋतुजा लटके आणि माजी मंत्री अनिल परब यांनी या निवडणुकीत भाजपनं माघार घेऊन कुरघोडी केल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर आता मुंबई भाजपचे अध्यक्ष आणि माजी मंत्री आशिष शेलारांनी या निवडणुकीच्या निकालावर प्रतिक्रिया दिली आहे. भाजप नेते आशिष शेलार यांनी ट्वीट करत विजयी उमेदवार ऋतुजा लटकेंचं अभिनंदन केलं आहे. लटकेंचा भाजपमुळंच विजय झाला असून आम्ही निवडणूक लढवली असतील तर निश्चित विजयी झालो असतो, असं आशिष शेलार यांनी म्हटलं आहे. याशिवाय काँग्रेस, राष्ट्रवादी, भाकपसह डझनभर पक्षांनी पाठींबा देऊनही 'शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे' गटाला ना मतदान जास्त झाले, ना मतं जास्त मिळाली, भाजपनं निवडणूक लढवली असती तर यांचा पराभव निश्चित होता, असंही आशिष शेलार म्हणाले. अंधेरीतील पोटनिवडणुकीसाठी भाजपनं मुरजी पटेल यांना उमेदवारी जाहीर केली होती. परंतु मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचं आवाहन केल्यानंतर भाजपनं या निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली होती. परंतु आता विजयी उमेदवार ऋतुजा लटके आणि माजी मंत्री आणि ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी भाजपनं माघार घेऊनही लोकांना नोटाला मतदान करण्याचं आवाहन केल्याचा आरोप केला आहे. अंधेरी पूर्व विधानसभेच्या पोटनिवडणुकीत ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटकेंना ६६,२४७ मतं मिळाली असून नोटा या पर्यायाला १२,७७६ मतं मिळाली आहेत.

## अन्न व औषध विभागाची मोठी कारवाई;

पदार्थांची एकूण किंमत 29.67 कोटी रुपये असून हा माल जप्त करण्यात आला आहे. येथील पेट्यांचे स्वरूप कोल्ड स्टोरेज असून यात बाहेरील देशातून आयात केलेल्या अन्न पदार्थांचा निकृष्ट दर्जाचा साठा आढळला. इथल्या कोल्ड स्टोरेजमध्ये वेगवेगळया पेट्यांमध्ये आयातदारांनी विविध देशांमधून मसाले, ड्राय फ्रुट्स, सिरप्स इत्यादी अन्न पदार्थ साठविलेले आढळले. अन्न पदार्थाच्या गोण्या व बॉक्स हे लाकडी प्लॅटफॉर्मवर साठविलेले होते. यापैकी 35 नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाकडून देण्यात आली आहे. तर 29 कोटींची साठा जप्त करून पुढील आदेश येईपर्यंत परवानाधारकाच्या ताब्यात ठेवण्यात आला आहे. या वेळी अन्न नमुने घेताना बऱ्याचशा अन्न पदार्थांवर काहीही नमूद नव्हते. सुरक्षा व कायदा 2006 व नियमन 2022 मधील तरतुदीचे उलंघन होत असल्याचे आढळून आले. निकृष्ट निकृष्ट दर्जाच्या पदार्थांची साठवणूक अन्न व औषध प्रशासन विभागाकडून छापा टाकण्यात आलेल्या कोल्डस्टोअरेजमध्ये वेगवेगळया आयातदार पेट्यांमध्ये वेगवेगळया देशांमधून मसाले, ड्रायफ्रूट्स, सीरप्स इत्यादी अन्नपदार्थ साठवलेले आढळले. या अन्नपदार्थांच्या गोण्या व खोकी हे लाकडी प्लॅटफॉर्मवर साठवलेले आढळले. कामगारांसाठी असणाऱ्या स्वच्छतागृहाच्या लगत अन्नपदार्थांची साठवणूक केल्याचे आढळून आले. तसेच कोल्डस्टोअरेजमध्ये झुरळ, उंदीर यांचा प्रादुर्भाव आढळून आला. या सर्व प्रकारामुळे अन्न पदार्थाची Nutritional Quality व Shelf Life यावर मोठ्या प्रमाणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. साठवणुक केलेल्या काही अन्न पदार्थांचा दर्जा निकृष्ट असल्याने व कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन झाल्याचे एफडीएचे म्हणणे आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांचे आदेशानुसार झाली असल्याचे समजते.

## आयकर अधिकारी बनवून केली 20 लाखांची

आरोपींनी त्यांना आपण आयकराच्या धाडीत अनेक रुपयांची रोकड जप्त केल्याचं सांगितलं. तसेच त्यांना नोटा बदली करण्याचे सांगत तुम्हाला 20 लाखांच्या बदल्यात 40 लाख रुपये देऊ, असे आमिष दाखवले. आरोपींनी रामदास बल्लाळ यांची मुंबई मधील नामांकीत व महागडया ओबेरॉय हॉटेल, ट्रायडंट हॉटेल, प्रितम हॉटेल अशा ठिकाणी भेटी घेतल्या. तसेच त्यांना मर्सडीस, फोरमॅटीक, हुंदाई क्रेटा, फॉर्च्युन अशा अलीशान कारमधून फिरवून त्यांचा विश्वास संपादित केला. यानंतर आरोपींनी त्यांच्याकडून 20 लाख रुपयांची रोकड घेतली. यानंतर आरोपींनी त्यांना 40 लाख रुपये देऊ असे सांगत चक्क 'भारतीय बच्चों का बँक' असे लिहलेल्या बनावट नोटांची बॅग देत त्यांची फसवणूक केली. यानंतर आरोपी फरार झाले होते. दरम्यान, पोलिसांनी या तिन्ही आरोपीना बेड्या ठोकल्या आहेत.

## मुलीसह प्रेयसीला सोडून तरुणाने केलं पलायन, मालवणी पोलिसांत तक्रार नाशकात गुन्हा दाखल

**नाशिक :** नाशिकच्या मालवणी पोलिसांत एका पीडित महिलेने दिलेली तक्रार आणि त्यानंतर तो गुन्हा नाशिकच्या अंबड पोलिसांत वर्ग झाल्यानंतर धक्कादायक घटना समोर आली आहे. नाशिकच्या अंबड पोलिसांत दाखल झालेल्या गुन्ह्यात एका तरुणाने लहानग्या मुलीसह प्रेयसीला सोडून धूम ठोकल्याचा प्रकार समोर आला आहे. प्रेमसंबंध ठेवत रजिस्टर मॅरेज करण्याचे तरुणाने प्रेयसीला दाखविले होते. तरुणाने युवतीसोबत शारीरिक संबंध ठेवत तिला गर्भवती केले होते. तीने मुलीला जन्म दिल्यानंतर दोघींनाही सोडून पळून गेल्याची बाब समोर आली आहे. यावरून नाशिकच्या अंबड पोलिसांत महिलेने दिलेल्या फियार्दीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबड पोलीस या घटनेचा अधिक तपास करीत आहे.



नाशिकच्या अंबड पोलीसांत पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार 31 वर्षीय मोजेस सोबत तिचे अनेक वर्षांपासून प्रेमसंबंध आहेत. त्यामध्ये मोजेस आणि पीडित महिला रजिस्टर मॅरेज करणार होते, त्यानुसार पीडित आणि मोजेस आठ महिन्यांपासून वास्तव्यास होते.

याच प्रेमसंबंधात मोजेस आणि पीडित महिला यांना तीन वर्षापूर्वी एक मुलगी झाली होती, त्यानुसार त्या मुलीला नातेवाईकांना त्या मुलीला दत्तक दिले होते. वर्ष उलटत नाही तोच पीडित महिला दुस-यांदा गर्भवती राहिली होती, तीने दोन महिन्यापूर्वीच एका मुलीला जन्म दिला होता.

दुस-यांदा मुलीला जन्म दिल्यानंतर मोजेस यांच्या वागण्यात बदल झाल्याचे पीडित महिलेने सांगितले होते. त्यानंतर मुलीसह प्रेयसीला सोडून मोजेस याने पलायन केल्याचे महिलेने म्हंटले आहे. संबंधित प्रकार पीडित महिलेने मालवणी पोलीस ठाण्यात कथन केला होता, नातेवाईकांना घेऊन पीडित महिला मालवणी पोलिस ठाण्यात गेली होती.

## एफडीएची मोठी कारवाई; गुटखा व पानमसाल्याचा लाखोंचा साठा जप्त

**पुणे :** राज्यात गुटखा बंदी असतांनाही मोठ्या प्रमाणात अवैधरित्या गुटखा विक्री केली जात आहे. पुण्यात देखील मोठ्या प्रमाणात गुटख्याची विक्री होत



असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन कार्यालयाला मिळाली. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन कार्यालयालयाने पुणे विभागात सुमारे ३० लाख ३७ हजार रुपये किंमतीचा गुटखा, पानमसाला आदी प्रतिबंधित पदार्थाचा साठा जप्त आहे.

पुणे कार्यालयाने वारजे माळवाडी येथील मे. मुकेश सुपर मार्केट येथे विमल पान मसाला, आर एम डी पान मसाला, व्ही. एन सुगंधित तंबाखू या प्रतिबंधित पदार्थाचा सुमारे १ लाख २० हजार १२९ रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी मालक मुकेश कुमार अग्रवाल यांच्याविरुद्ध वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे. या ठिकाणी पुन्हा प्रतिबंधित पदार्थाची विक्री रोखण्यासाठी त्यांचे दुकान सिल करण्यात आले असून दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्र देखील रद्द करण्यात आले आहे. तसेच यापूर्वी बावधन येथील मे. नरेंद्र ट्रेडर्सचे मालक गोविदराम प्रजापती यांच्याकडून सुमारे २३ हजार ३५० रुपये किमतीचा साठा जप्त करून त्यांच्याविरुद्ध हिंजवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोल्हापुर कार्यालयातर्फे कनार्टक येथून एमएच-१२-आरएन-१२७१ या वाहनातून महाराष्ट्रामध्ये विक्रीसाठी सुमारे १८ लाख ७२ हजार १०० रुपये किंमतीचा प्रतिबंधित पदार्थाचा साठा तसेच ८ लाख ५० हजार रुपये किंमतीचे वाहन असा सुमारे २७ लाख २२ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध गोकुळ शिरगाव पोलिस ठाणे, कोल्हापुर येथे गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे.

सांगली कार्यालयातर्फे मागील पाच दिवसात विविध सात ठिकाणावरून सुमारे १ लाख ७१ हजार ५१९ रुपये किंमतीचा प्रतिबंधित पदार्थाचा साठा जप्त करुन संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

## शेतात राखण करायला गेलेल्या तरुणाचा मृतदेहच आढळला, 'या' कारणामुळे तरुणाला संपवले

**महोबा :** शेतात शौच करण्यास मनाई केली म्हणून एका माथेफिरुने तरुणाची निर्दयीपणे हत्या केल्याची घटना उत्तर प्रदेशातील महोबा जिल्ह्यात घडली आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. या घटनेमुळे गावात स्मशान शांतता पसरली आहे. सोनू विश्वकर्मा असे हत्या करण्यात आलेल्या 22 वर्षीय तरुणाचे नाव आहे. तर राजकुमार राजपूत असे हत्या करणा-या आरोपीचे नाव आहे. महोबा जिल्ह्यातील कॅथोरा गावात ही घटना घडली आहे.

मयत सोनूचे वडिल जीत विश्वकर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी सोनूने राजकुमारला शेतात शौच करण्यास मनाई केली होती. यावरुन राजकुमार आणि सोनू यांच्यात जोरदार वादावादी झाली होती. त्यावेळी राजकुमारने सोनूला



जीवे मारण्याची धमकी दिली होती.

यानंतर राजकुमार खूप चिडला होता. सोनूविषयी त्याच्या मनात प्रचंड खुन्नस निर्माण झाली होती. काल रात्री सोनू शेतात राखण करण्यासाठी गेला होता. यावेळी राजकुमार कु-हाडीने वार करुन त्याची हत्या केली. कुटुंबीयांनी घटनेची माहिती मिळताच सर्व जण शेतात पोहचले. यावेळी रक्ताच्या थारोळ्यात सोनूचा मृतदेह पडला होता. नातेवाईकांनी पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला.

यानंतर चौकशी दरम्यान पोलिसांना राजकुमारने हत्या केल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ आरोपी राजकुमारला अटक केली आहे. पोलीस पुढील कारवाई करत आहेत. महोबा याआधी काही दिवसांपूर्वी 50 वर्षीय महिलेची घरात घुसून कु-हाडीने वार करत हत्या करण्यात आली आहे. घटनेच्या वेळी महिलेची मुलं शेतात राखण करण्यासाठी गेले होते.

## बारामतीतील पत्राकारावरील गोळीबार किरकोळ वादातून; पाच संशयित पोलिसांच्या ताब्यात



**पुणे:** बारामती येथील पत्राकरांवरील हल्ला प्रकरणी धक्कादायक माहिती पुढे येत आहे. हा हल्ला किरकोळ कारणावरून झाल्याचे उघड झाले आहे. गुरुवारी बरांतीतील जळोची येथे सायंकाळीही घटना घडली होती. याप्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने या गोळीबारा प्रकरणी पाच जणांना अटक केली आहे.

सराईत गुन्हेगार शुभम विकास राजपुरे (वय २४, रा. राजपुरेवाडी, मुर्टी मोडवे, बारामती), तुषार चंद्रकात भोसले (वय २२, रा. रूई पाटी, बारामती), तेजस रतीलाल कर्चे (वय २१, रा. सूर्यनगरी, एमआयडीसी, बारामती), विक्रम लालासाहेब बोबडे (वय २६), सूरज राजू काशीद (वय २७ दोघे रा. रुई सावळ, बारामती) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. बारामती परिसरातील जळोची रस्ता परिसरात ऋत्विक जीवन मुळीक रस्ता ओलांडत असताना आरोपी तुषार भोसले दुचाकीवरुन जात होता. दुचाकीने हुल दिल्याने मुळीक आणि भोसले यांच्यात किरकोळ वाद झाला. त्या वेळी भोसलेने मुळीक याला मारहाण करुन तेथून पसार झाला. काही वेळानंतर तुषार भोसले, साथीदार सूरज काशीद, शुभम राजपुरे, तेजस कर्चे, विक्रम बोबडे तेथे आले. आरोपींनी मुळीक, त्यांचे मित्र पत्रकार गणेश जाधव, अतुल भोलाशंकर यांना मारहाण केली. त्यांच्यावर कोयत्याने वार केले. आरोपींनी त्यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार केला. या घटनेत जाधव गंभीर जखमी झाले. घटनेनंतर आरोपी तिथून पसार झाले. ग्रामीण पोलीस अधीक्षक अंकित गोयल, अतिरिक्त अधीक्षक मिलिंद मोहिते यांनी आरोपींना पकडण्याचे आदेश दिले. त्यानंतर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि बारामती पोलिसांच्या पथकाने आरोपींचा शोध घेऊन आरोपींना पिंपरी-चिंचवड परिसरातील एका लॉजमधून अटक केली. शुभम राजपुरे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर तब्बल १३ गंभीर गुन्हे दाखल आहेत. सध्या तो भोसरी येथील खुनाच्या गुन्ह्यात कोरोना कालावधीत जेलमधुन रजेवर सुटलेला आहे, अशी माहिती ग्रामीण पोलिस अधीक्षक गोयल यांनी पत्रकार परिषदेत दिली. अपर पोलीस अधीक्षक बारामती विभाग मिलिंद मोहिते,उपविभागीय अधिकारी गणेश इंगळे, याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक शेळके, पोलीस निरीक्षक प्रभाकर मोरे, सहायक निरीक्षक नेताजी गंधारे, सचिन काळे, पोलीस उपनिरीक्षक अभिजीत सावंत आदींनी ही कारवाई केली.

## पुण्याच्या वाहतूक कोंडीला मेट्रो जबाबदार

### महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्तांच्या पाहणी दौ-यातील निष्कर्ष

**पुणे :** पुण्यातील वाहतूक कोंडीवरून पोलिस आणि महापालिका आयुक्तांमध्ये लेटर वॉर सुरू झाले होते. या नंतर दोन्ही आयुक्तांनी केलेल्या संयुक्त पाहणीत पुण्यातील वाहतूक कोंडीला मेट्रोला जबाबदार ठरवण्यात आले आहे. मेट्रोकडून कामाच्या ठिकाणी लावलेल्या लोखंडी जाळ्यांमुळे (बॅरिकेटिंग) वाहतुकीचा वेग संथ होऊन वाहतूक कोंडी होत आहे. काम सुरू नसताना आणि आवश्यकता नसतानाही मेट्रोकडून ठिकठिकाणी लोखंडी जाळ्या लावण्यात आल्याने मेट्रोवर कारवाई का करण्यात येऊ नये, असा खुलासा मागविण्याचा निर्णय महापालिका आणि पोलिसांच्या संयुक्त पाहणीत घेण्यात आला आहे. शहराच्या विविध भागातील कामांची पाहणी पोलीस आयुक्त अभिनव गुप्ता, महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी शुक्रवारी केली. पुण्यात वाहतूक कोंडी हा गंभीर प्रश्न बनला आहे. या कोंडीत स्वतः मुख्यमंत्री आणि आमदार खासदार हे फासले आहेत.



या सततच्या वाहतूक कोंडीवर उपाय योजना करण्याच्या सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केल्या होत्या. यानंतर या कोंडीला पुण्यातील खड्डे आणि बीआरती जबाबदार असल्याचे पुणे पोलिस आयुक्तांनी ठरवले होते. त्यानुसार खड्डे बुजवण्यात यावे आणि बीआरती बंद करण्याच्या सूचना त्यांनी पालिकेला केल्या होत्या. मात्र, हे शक्य नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले. दरम्यान, दोन्ही आयुक्तांनी संयुक्त दौरा केला. या त्यांच्या दौ-यात शहरात महामेट्रो आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत मेट्रो प्रकल्पाची कामे सुरू आहेत. तसेच काही ठिकाणी उड्डाणपूल तसेच अन्य विकसनाची कामे सुरू आहेत. त्यामुळे वाहनचालकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. जागा पाहणीवेळी काही सूचनाही संबंधित यंत्रणांना पोलीस आणि महापालिकेच्या अधिका-यांकडून देण्यात आल्या.

या सूचनांमुळे शहरातील वाहतूक कोंडी काही प्रमाणात कमी होईल, असा दावा पोलीस आणि महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला. शहरात मेट्रोची अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत. मेट्रोचे काम ज्या ठिकाणी सुरू आहे, त्या ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे लोखंडी जाळ्या लावाव्यात. मेट्रोचे काम सुरू असलेल्या ठिकाणी पडलेले सर्व खड्डे, चेंबर्स समपातळीत आणण्याची कार्यवाही मेट्रोने करावी. तसे त्यांना कळविण्यात यावे. आवश्यकता नसताना लोखंडी जाळ्या लावण्यात आल्याने वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मेट्रोवर कारवाई का करण्यात येऊ नये, याचा खुलासाही मागविण्याचा निर्णय पाहणी दौ-यात घेण्यात आल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

## गुळुंचेत रंगला काटेबारस यात्रेचा थरार; बाभळीच्या काटेरी ढिगावर भाविकांनी मारल्या उड्या

हर भोले.. हर..हर.. महादेव....ज्योतिर्लिंग महाराज की जय.... या गगनभेदी जयघोषात भक्ती आणि शक्तीची प्रेरणा देर्णाया श्री.ज्योतिर्लिंगाची काटेबारस यात्रा उत्साहात साजरी झाली. भगवान शिवाप्रती असलेल्या श्रद्धेने बाभळीच्या काटेरी ढिगावर भाविकांनी उड्या घेतल्या. उघड्या अंगाने काटेरी ढिगावर लोळणारे भक्त पाहण्यासाठी राज्यासह परराज्यातील हजारोंच्या संख्येत शिवभक्त उपस्थित होते. काटेरी ढिगावर लोळणारे भक्त पाहून लोकांच्या डोळ्याचे पारणे फिटले.

पुरंदर तालुक्यातील गुळुंचे गावचे ग्रामदैवत असलेल्या ज्योतिर्लिंग महाराजांची यात्रा दिवाळी पाडव्याला सुरुवात झाली. प्रतिपदेला घटस्थापना झाल्यानंतर काकड आरती, शिवनाम जप, ध्यान, आरत्या, शिवालीलामृताचे पठन, भजन, कीर्तन सुरु झाले होते. प्रतिपदेच्या दुर्सया दिवसापासून अकरा रात्री अनवाणी पायाने भक्त देवाप्रती



आपली श्रद्धा छबिन्यात नाचुन व्यक्त केली. कुटुंबातील किमान एक सदस्यांने गोडाचा उपवास केला जातो. (छायाचित्र : हमिद सय्यद, सासवड)

गुरुवारी रात्री देवाची पालखी उत्सव मुर्तीसह ग्रामप्रदक्षिणा करण्यासाठी छबिन्यासह निघाली. एकादशीला (शुक्रवारी) सकाळी अकरा वाजता पालखीतुन उत्सव मुर्ती व मानाच्या कठिला नीरा नदीत स्नानासाठी नेण्यात आल्या. यावेळी गुळूंचेची ज्योतिर्लिंगाची, कर्नलवाडीच्या जोतिबाची उत्सवमुर्ती तसेच देवाची बहीण समजली जाणारी काठीसह रथातून नीरेकडे मार्गक्रमण केले. दुपारी एकच्या सुमारास मुर्त्यांना व काठीला प्रसिद्ध दत्तघाटावर स्नान घालण्यात आले. नीरा बाजारपेठेतुन सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. (छायाचित्र : हमिद सय्यद, सासवड)

सायंकाळी पालखी गुळुंचे गावात दाखल झाल्यानंतर दोन्ही पालख्या गायकवाड वस्तीतील विसावा स्थळावर विसावल्या. रात्री किर्तन संपल्यावर छबिन्याला सुरुवात केली गेली. शनिवारी द्वादशीला पहाटे साडेतीन वाजता शिवभक्तांनी मंदिरा शेजारी अंघोळ करून गावाबाहेरील मानाच्या कठीचे दर्शन घेऊन मंदिरात पर्यंत दंडवत घातले. दंडवता यावर्षी थंडी जास्त जाणवली. तरीही भक्तांनी तोही क्षण आनंदाने साजरा केला. गुळुंचे गावसह बारा वाड्यातील ग्रामस्थांनी ग्रामदैवतास पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला. मानक-यांनी व नवस फेडणा-यांनी मुख्य कळसावर दस बांधले.

## ऋतुजा लटके पोटनिवडणुकीत विजयी

अंधेरी पूर्व विधानसभेच्या पोटनिवडणुकीत शिवसेनेतील ठाकरे गटाला मोठी नवसंजीवनी मिळाली आहे. कराण या निवडणुकीत ठाकरे गटाच्या



उमेदवार ऋतुजा लटके यांचा मोठ्या फरकानं विजय झाला आहे. हाती आलेल्या माहितीनुसार त्यांना आतापर्यंत ५८ हजार ८७५ मतं मिळाली असून त्यानंतर नोटा या पयार्याला ११ हजार ५६९ मतदारांनी पसंती दिली आहे. त्यामुळं अजून काही फे-या बाकी असल्या तरी ऋतुजा लटकेंचा विजय निश्चित झाला आहे. त्यानंतर आता ठाकरे गटाच्या समर्थकांनी मुंबईत ठिकठिकाणी या विजयाचा आनंदोत्सव साजरा करायला सुरुवात केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी अंधेरीत मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर पहिल्या फेरीपासून ठाकरे गटाच्या उमेदवार ऋतुजा लटकेंनी आघाडी घेतली होती. ही आघाडी प्रत्येक फेरीत त्यांनी कायम राखली. त्यांच्यानंतर नोटा या पयार्याला सर्वाधिक मतं मिळाली आहेत. मतमोजणीच्या १९ फे-या होणार असून यापैकी १६ फे-यांची मतमोजणी पूर्ण झाली आहे. त्यात ऋतुजा लटकेंना मिळालेली आघाडी विरोधी उमेदवारांना तोडणं अशक्य असल्यानं त्यांचा विजय निश्चित झाला आहे.

## सायरस मिस्त्री अपघात प्रकरण, दोन महिन्यानंतर महिला कार चालकावर गुन्हा दाखल

**पालघर :** टाटा सन्सचे माजी अध्यक्ष आणि प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांच्या अपघात प्रकरणी दोन महिन्यानंतर महिला कार चालक अनहिता पंडोल यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनहिता पंडोल कासा पोलीस ठाण्यात यांच्या विरोधात कलम 304 (अ), 279, 337, 338, टश्अ 112/183, 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनहिता पंडोल यांचे पती डेरिअस पंडोल यांच्या जबाबानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी सांगितले.

उद्योगपती सायरस मिस्त्री यांच्या अपघाती मृत्यूनंतर तब्बल दोन महिन्यांनी याच गाडीत प्रत्यक्षदर्शी असलेल्या चालक अनाहीता पंडोल यांचे पती डेरिअस पंडोल यांचा पालघर पोलिसांनी जबाब नोंदवला आहे. डेरिअस पंडोल हे याच अपघातात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर दोन महिन्यांपासून रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र त्यांची प्रकृती सुधारताच मुंबई येथील त्यांच्या राहत्या घरी जाऊन पालघर पोलिसांनी या अपघात प्रकरणात त्यांचा जबाब नोंदवला आहे. दुर्घटनास्थळी अचानक तीन लेनच्या दोन लेन झाल्याने हा अपघात घडल्याचं डेरिअस पंडोल यांनी आपल्या जबाबात म्हटलं आहे. अपघात घडला त्यावेळी पती डेरिअस पंडोल चालक अनहिता पंडोल यांच्या शेजारील पुढील सीटवरील बसले होते. चालक अनहिता पंडोल अजूनही उपचार घेत असून त्यांची प्रकृती सुधारताच त्यांचाही जबाब नोंदवण्यात येईल, असे पाटील यांनी सांगितले.

## अल्पवयीन बलिकेवर विनयभंग प्रकरणी आरोपीला सात वर्षानंतर शिक्षा, नाशिकच्या न्यायालयात काय घडलं ?

**नाशिक :** तब्बल सात वषार्नंतर विनयभंग केलेल्या एका नराधमाला न्यायालयाने तीन वर्षे सश्रम तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. नाशिकच्या सिन्नरमध्ये ही धक्कादायक आणि संतापजनक घटना घडली आहे. नऊवर्षीय बलिकेला मोबाईलवर अश्लील चित्रफिती दाखवत तिचा विनयभंग केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी सिन्नर पोलीस ठाण्यात विनयभंग केल्याच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याबाबत जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली असून तीन वर्षे सश्रम तुरुंगवासाची शिक्षा सुनावली असून पीडितेला तब्बल सात वर्षांनी न्याय मिळाला आहे. नाशिकच्या ग्रामीण भागात घडलेल्या या घटनेनंतर नराधमाला फाशीची शिक्षा द्या अशी मागणी होऊ लागली होती. त्यावरून संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान उशिरा का होईना पीडितेला न्याय मिळाल्याने समाधान व्यक्त केले



जात आहे.

गणेश सदाशिव जाधव असं 24 वर्षीय शिक्षा सूनावलेल्या आरोपीचे नाव असून सिन्नर शहरातील टिकोणी गल्ली येथे तो राहणारा आहे. 3 ऑक्टोबर 2015 ला नऊवर्षीय बालिका घरात एकटी असताना ओळखीतील असलेल्या आरोपीने घरात घुसून हे कृत्य केले होते. नऊ वर्षीय बालिकेला आरोपीने अश्लील चित्रफिती दाखवत विनयभंग केल्याची घटना समोर आली होती त्यावरून सिन्नर पोलिसांत फिर्याद देण्यात आली होती. फियार्दी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सिन्नर पोलिस ठाण्यात विनयभंगासह बाललैंगिक अत्याचार संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला होता.

सिन्नर पोलीस ठाण्यातील पोलीस उप निरीक्षक टी. एन. आठवले यांच्याकडे याबाबतचा तपास होता त्यांनी पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाचे विशेष न्यायदंडाधिकारी डी. डी. देशमुख यांच्या कोर्टात हा खटला सुरू होता आज त्यावर शिक्षा सुनावण्यात आली आहे.


पोलीस बातमी पत्र

ALL SCAN & PAY ACCEPTED HERE

PhonePe

G Pay

Pay



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898